जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - १०४९ दिनांक ०२/०७/२०२०**

## दत्तवाडी पोलीस ठाणे

## लॉकडाऊन काळात तब्बल अडीच लाख रुपये किंमतीचे २४ स्मार्टफोन चोरणा-या दोन सराईतांना दत्तवाडी पोलीसांनी केले जेरबंद. त्यांचेकडुन सर्व स्मार्टफोन केले हस्तगत.

दि. ०१/०७/२०२० रोजी दत्तवाडी पोलीस ठाणेचे तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक स्वप्नील लोहार हे त्यांच्या स्टाफसह दत्तवाडी पोलीस ठाणेमधील त्यांचे कार्यालयात हजर असताना पो. शि. सागर सुतकर यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "दोन इसम हे सध्या पाटे संस्कृती मैदानात, विहीरीजवळ, झाडाखाली, सहकारनगर नं. २, पुणे येथे त्यांचेकडील वॉलनट ब्राऊन कलरच्या टीव्हीएस ज्युपीटर मोपेड गाडी क्र. एम एच १२ आर यु ०६६० हिचेवर बसलेले असुन त्यांचेकडे एक मोटो कंपनीचा मोबाईल आहे. तो विकण्याचा ते प्रयत्न करत असुन त्यांचेकडे सदर मोबाईलची पावतीही नाही. त्यातील एकाने त्याचे अंगात काळे रंगाची जीन्स पॅन्ट व क्रीम कलरचा हाफ बाहयाचा टिशर्ट घातलेला असुन दुस-याने त्याचे अंगात पांढरा फुलबाहयाचा नक्षी असलेल्या शर्ट व निळया रंगाची हाफ जीन्स पॅन्ट घातलेली आहे. तरी त्यांचेकडे असणारा मोटो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट हा चोरीचाच असावा." अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची बातमी पोलीस उपनिरिक्षक स्वप्नील लोहार यांना कळविली असता त्यांनी सदरची बातमी ही वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांना कळविली असता त्यांनी कारवाईबाबत मार्गदर्शन करुन तत्काळ कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केल्याने पोलीस उपनिरिक्षक स्वप्नील लोहार यांनी स्टाफसह खाजगी वाहनाने तत्काळ पाटे संस्कृती मैदान येथे जावुन थोडे आडबाजुस थांबुन खात्री केली असता तेथे वरील वर्णनाच्या गाडीवर दोन इसम संशयास्पदरित्या बसलेले असलेले त्यांना दिसुन आल्याने ते स्टाफसह त्यांचेकडे जावु लागले असता पोलीसांना पाहताच ते दोघेही गाडी चालु करुन तेथुन पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना पोलीसांनी अत्यंत शिताफीने जागीच पकडले. व त्यांना त्यांची नावे पत्ते विचारता त्यांनी आपली नावे १) अमर वैजनाथ समुखराव, वय. २० वर्षे, धंदा. काहीनाही, रा. कदम बिल्डींग होस्टेल, रुम नं. १, राधाकृष्ण हॉटेलजवळ, चंद्रभागा चौक, आंबेगाव पठार, पुणे. मुळ पत्ता - मु.पो. पांढरगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी व २) प्रविण ऊर्फ अनिल नामदेव विटकर, वय. २३ वर्षे, धंदा. काहीनाही, रा. जांभुळवाडी रोड, शनिनगर चौक, शनिमंदीराजवळ, कात्रज, पुणे अशी असल्याची सांगीतली.

त्यावेळी पोलीसांनी त्यांना वाहन चालविण्याचा परवाना व गाडीची मुळ कागदपत्रे मागीतली असता ती त्यांचकडे नव्हती. त्यानंतर पोलीसांनी त्यांची अंगझडती घेतली असता त्यातील अमर वैजनाथ समुखराव याचे पॅन्टचे खिशात पोलीसांना मोटो कंपनीचा काळे रंगाचा जी-५ एस प्लस हा मोबाईल हॅन्डसेट मिळुन तो कोठुन आणला कोणाचा आहे याबाबत त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी सदरचा मोबाईल हॅन्डसेट हा गणराज बिल्डींग, तावरे कॉलनी, पर्वती पुणे या घरातुन चोरला असल्याचे सांगीतले त्यावेळी पोलीसांनी खात्री केली असता सदर मोटो कंपनीचा काळे रंगाचा जी-५ एस प्लस हा मोबाईल हॅन्डसेट चोरीस गेलेबाबत दत्तवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २००४/२०२०, भा.द.वि. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने पोलीसांनी नमुद दोघांनाही ताब्यात घेवुन त्यांना दाखल गुन्हयात अटक करुन त्यांचेकडे अधिक विश्वासात घेवुन तपास केला असता त्यांनी पुणे शहरात मागील तीन महीन्यात आणखी २३ मोबाईल हॅन्डसेट चोरल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदरचे तब्बल २,५०,०००/-रुपये किंमतीचे एकुण २४ मोबाईल हॅन्डसेट त्यांचेकडुन जप्त करण्यात आले आहेत. तसेच अटक मुदतीत त्यांना मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांची पोलीस कस्टडीची रिमांड मंजुर केली असुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सदरची कारवाई ही दत्तवाडी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक देविदास घेवारे व पोलीस निरिक्षक (गुन्हे) राजेंद्र सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उपनिरिक्षक स्वप्नील लोहार व पो.हवा. राजु जाधव, तानाजी निकम, रविंद्र फुलपगारे, पो.ना. सुधीर घोटकुले, महेश गाढवे, सोमेश्वर यादव, पो.कॉं. सागर सुतकर, विकास कदम, नवनाथ भोसले, अमित सुर्वे, शिवाजी क्षीरसागर, शरद राऊत, राहुल ओलेकर अक्षयकुमार वाबळे, यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पोलीस उपनिरिक्षक स्वप्नील लोहार दत्तवाडी पोलीस ठाणे पुणे शहर हे स्वतः करीत आहेत.